आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र रात्री ८.०५ वाजता

२३ मार्च २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- भूतान भेटीमुळं दोन्ही देशातले संबंध वृद्धिंगत व्हायला मदत होईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याचं प्रतिपादन

- कांद्यावरच्या निर्यात बंदीला केंद्र सरकारकडून अनिश्चित काळासाठी मुदतवाढ

- समुद्रात भारतीय नौदलाच्या अधिकाऱ्यांवर हल्ला करणारे ३५ सोमाली चाचे मुंबई पोलिसांच्या ताब्यात

- पंजाबमध्ये विषारी मद्यप्राशन केल्यानं २१ जणांचा मृत्यू

**आणि**

- रशियात झालेल्या दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्यांची संख्या ११५ वर, जगभरातून शोक व्यक्त

**<><><><><><>**

भूतान भेटीमुळं या देशाशी असलेले संबंध यापुढे अधिक वृद्धिंगत व्हायला मदत होईल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज आपल्या दोन दिवसीय भूतान दौऱ्यावरून मायदेशी परतल्यावर समाज माध्यमावर याबाबत माहिती दिली. भूतानचे राजे जिग्मे खेसार नामग्येल वांगचुक आणि प्रधानमंत्री त्शेरिंग तोबगे यांना भेटण्याची संधी मिळाल्याने हा दौरा आपल्यासाठी विशेष असल्याचं त्यांनी सांगितलं. ‘ऑर्डर ऑफ द ड्रयूक ग्यालपो’ या उपाधीनं आपला सन्मान केल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. भूतानच्या जनतेनं केलेल्या

आदरातिथ्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. त्याआधी, मोदी आणि तोबगे यांनी थिम्पू इथं 'ग्याल्ट्सुएन जेत्सन पेमा वांगचुक मदर अँड चाइल्ड हॉस्पिटल' या भारत सरकारच्या सहाय्यानं दोन टप्प्यात उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक रुग्णालयाचं उद्घाटन केलं.

**<><><><><><>**

केंद्र सरकारनं कांद्यावरची लावलेली निर्यात बंदी पुन्हा अनिश्चित काळासाठी वाढवली आहे. याबाबतची अधिसूचना काल जारी करण्यात आली. याआधी कांदा निर्यात बंदी ३१ मार्च पर्यंत लागू करण्यात आली होती.

बाजारामध्ये लाल कांदा संपला असून उन्हाळा कांदा येण्यास सुरुवात झाली आहे. आता शेतकऱ्यांना दोन पैसे मिळण्याची अपेक्षा होती. त्यावेळी घेतलेला निर्यात बंदीचा निर्णय शेतकरी विरोधी असल्याचा आरोप स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप यांनी केला.

**<><><><><><>**

समुद्रात होत असलेल्या चाचेगिरीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तैनात केलेली आय एन एस कोलकाता ही युद्धनौका ताब्यात घेतलेल्या ३५ सोमाली चाच्यांना घेऊन आज मुंबईत दाखल झाली. या चाच्यांना यलो गेट पोलिसांच्या हवाली करण्यात आलं आहे.

एडनच्या आखातात ही युद्धनौका तैनात होती. नौकेवर सागरी चाच्यांच्या संशयास्पद हालचालींवर ड्रोनच्या सहाय्यानं ताबा मिळवल्यावर भारतीय नौदलानं आय एन एस कोलकाताच्या माध्यमातून या चाच्यांना ताब्यात घेतलं होतं. या चाच्यांनी नौदलाच्या अधिकाऱ्यांवर गोळीबार केल्यानं त्यांना भारतात आणल्याची माहिती नौदलाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

<><><><><>

कुख्यात गुंड विठ्ठल पुजारी उर्फ प्रसाद पुजारी याचं आज चीनमधून भारतात प्रत्यार्पण झालं. मुंबई पोलीसांच्या गुन्हे शाखेनं त्याला आज मुंबईत आणलं. विशेष मोक्का न्यायालयानं त्याला १४ दिवसांची गुन्हे शाखेची कोठडी दिली आहे.

पुजारी विरोधात खुन, खुनाचा प्रयत्न, खंडणी, फौजदारी कट रचणं, शस्त्रास्त्र बाळगणं अशा प्रकारचे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. मात्र तो देशाबाहेर फरार झाला होता. त्याचा माग घेत असताना, भारतीय गुप्तचर यंत्रणेनं दिलेल्या माहितीआधारे, चीनच्या सुरक्षा यंत्रणेनं त्याला फेब्रुवारी २०२३ मध्ये हाँगकाँग इथं खोटा पासपोर्ट बाळगल्याप्रकरणी अटक केली होती. यानंतर भारतानं त्याला आपल्या ताब्यात देण्यासाठी सातत्यानं केलेल्या प्रयत्नांनतर त्याचं भारतात प्रत्यार्पण केलं गेलं.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये दंतेवाडा जिल्ह्यात काल रात्री माओवाद्यांनी केलेल्या आयईडीच्या स्फोटात बस्तरमध्ये २ जवान जखमी झाले. केंद्रीय राखीव दल, बस्तर सैनिक आणि जिल्हा राखीव दल यांचे संयुक्त पथक किरंदुल भागात शोध मोहिमेवर असताना बॉम्ब स्फोट झाला. जखमी जवानांना रायपूरच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. बिजापूर जिल्ह्यात पिडिया भागात सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये चकमक सुरू असून चकमकीत दोन माओवादी ठार झाले आहेत.

<><><><><>

काँग्रेसचे आमदार म्हणून अपात्र ठरलेल्या हिमाचल प्रदेशच्या ६ माजी आमदारांनी आज नवी दिल्लीत केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर आणि हिमाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जय राम ठाकूर यांच्या उपस्थितीत भाजप पक्षामध्ये प्रवेश केला.

अपात्र ठरलेल्या माजी आमदारांमधे सुधीर शर्मा, रवी ठाकूर, इंदर दत्त लखनपाल, देवेंद्र भुट्टो आणि चैतन्य शर्मा यांचा समावेश आहे.

याशिवाय ३ अपक्ष आमदारांनीही भाजपामध्ये आज प्रवेश केला.

**<><><><><><>**

ज्येष्ठ काँग्रेस नेत्या तसंच लोकसभेच्या पूर्व सभापती मीरा कुमार यांनी यंदा लोकसभेची निवडणूक लढवणार नसल्याचा निर्णय घेतला आहे. पाच वेळा खासदारकी भूषवलेल्या मीरा कुमार यांनी सासाराम मतदार संघाचं अनेकवेळा प्रतिनिधित्व केलं.

**<><><><><><>**

पंजाबमधे संगरूर जिल्ह्यात अनेक गावांमध्ये विषारी दारू प्यायल्यानं मृत्यू झालेल्यांची संख्या एकवीसवर पोहोचली आहे. विषारी दारुच्या सेवनामुळे रुग्णालयात दाखल केलेल्या आणखी सात जणांचा आज मृत्यू झाला, तर २० जणांवर अद्याप उपचार सुरु आहेत.

या घटनेनंतर राज्यातलं विषारी दारुचं जाळं नष्ट करण्यासाठी पंजाब पोलीसांनी अतिरीक्त पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली चार जणांचं विशेष तपास पथक स्थापन केलं आहे. याप्रकरणी आतापर्यंत आठ जणांना अटक केली असल्याची माहिती पंजाब पोलिसांनी दिली आहे.

दरम्यान पंजाबच्या मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांनी या घटनेचा अहवाल पंजाबच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करावा, आणि त्यांनी तो भारत निवडणूक आयोगाला सादर करावा, असे निर्देश आयोगानं दिले आहेत.

**<><><><><><>**

अरुणाचल प्रदेशवर चीननं केलेला दावा हास्यास्पद असल्याचं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज आपल्या सिंगापूर भेटीत, इन्स्टिट्यूट ऑफ साऊथ एशियन स्टडीज इथं आयोजित कार्यक्रमात बोलत होते. केवळ इतर देश म्हणतात म्हणून नाही, तर अरूणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

स्थिरता नसलेला आणि राजनैतिक मुद्यांसाठी दहशतवादाचा खुलेपणानं वापर करणारा देश भारताचा शेजारी असणं दुर्दैवी असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

जयशंकर तीन दिवसांच्या सिंगापूर दौऱ्यावर आहेत. दरम्यान जयशंकर यांनी आज दुपारी सिंगापूरमधल्या आघाडीच्या व्यावसायिकांशी संवाद साधला.

**<><><><><>**

देशाच्या अंतर्गत बाबींवर जर्मनीच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या केलेल्या टिप्पणीचा भारतानं निषेध केला आहे. जर्मनीच्या भारतातल्या दुतावासाचे उपप्रमुख यांच्याकडे भारतानं प्रतिक्रिया नोंदवली. अशा प्रकारच्या टिप्पण्यांकडे न्यायालयीन प्रक्रियेत तसंच भारताच्या न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप करणं या दृष्टीने पाहत असल्याचं भारतानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

रशियात झालेल्या दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्यांची संख्या ११५ वर पोहोचली आहे. या घटनेचा आंतरराष्ट्रीय समुदायानं निषेध केला आहे. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरस यांनी काल मॉस्को इथल्या क्रोकस सिटी हॉल इथं झालेल्या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं रशियन महासंघाच्या सरकारला सक्रिय सहकार्य करावं असं आवाहन केलं आहे. हा दहशतवादी हल्ल्या करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असं आवाहन सर्व संबंधित

प्राधिकरणांनी केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मॉस्को इथं कॉन्सर्ट मध्ये झालेल्या हल्ल्याबद्दल निषेध व्यक्त केला आहे. अमेरिका, युरोपीय महासंघ, इंग्लंड, फ्रान्स, स्पेन आणि संयुक्त अरब अमिरातीनं या घटनेमुळे आपल्याला धक्का बसल्याचं म्हटलं आहे. फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युएल मॅक्रोन यांनी हल्ल्यात बळी पडलेल्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांच्या मागे आपला देश ठामपणे उभा असल्याचं सांगितलं आहे. स्पेननेही या घटनेचा निषेध केला आहे. तर इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांनी ही घटना निंदनीय असल्याचं म्हटलं आहे आपण हल्ल्यात बळी पडलेल्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, असं त्या म्हणाल्या. इस्लामिक स्टेट खोरासान यांनी या हल्ल्याची जबाबदारी स्विकारली आहे. हल्ल्यात बळी पडलेल्याची संख्या ११५ वर पोहोचली असून ही संख्या वाढण्याची भीती रशियाच्या तपास समितीने व्यक्त केली आहे.

<><><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची नावं निश्चित करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची आज नवी दिल्ली इथं पक्षाच्या मुख्यालयात बैठक होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह समितीचे सदस्य आणि राज्यांतील पदाधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. या बैठकीपूर्वी नवी दिल्लीत त्यांनी उदयनराजे भोसले यांची भेट घेतली.

<><><><><><>

आयपीएलमध्ये पंजाब किंग्जनं आज दिल्ली कॅपीटल्सचा ४ गडी राखून पराभव केला. ४ चेंडू शिल्लक असताना पंजाबनं ६ गड्यांच्या मोबदल्यात १७७

धावा केल्या आणि सामना जिंकला. या सामन्यात पंजाबनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला, त्यानंतर दिल्लीनं निर्धारीत २० षटकांत ९ गडी बाद १७४ धावा केल्या होत्या. ६३ धावा करणारा सॅम करन सामनावीर ठरला.

दुसरा सामना कोलकाता क्नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात कोलकात्यात सुरू आहे. सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा कोलकात्याच्या ७ षटकात ३ बाद ४९ धावा झाल्या होत्या.

//<><><><><><>//